# विधानसभा आश्वासन समिती

(२०१४-२०१५)

( तेरावी महाराष्ट्र विधानसभा )

# पहिला अहवाल

(सन २०१३ च्या पहिल्या अधिवेशनातील उर्वरित प्रलंबित आश्वासनांसंबंधीचा अहवाल)

(दिनांक , २०१५ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१५

# महाराष्ट्र विधानसभा

## आश्वासन समिती

## (२०१४-२०१५)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

# पहिला अहवाल

(सन २०१३  च्या पहिल्या अधिवेशनातील उर्वरित प्रलंबित आश्वासनांसंबंधीचा अहवाल)

## विधानसभा आश्वासन समिती
## (२०१३-२०१४)

| | | |
|---|---|---|
| समिती प्रमुख | | |
| १. | श्री.नवाब मलिक, वि.स.स तथा समिती प्रमुख | |
| सदस्य | | |
| २. | श्री. विलासराव (काका)पाटील , वि.स.स. | |
| ३. | श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स. | |
| ४. | श्री.रामप्रसाद कदम - बोर्डीकर, वि.स.स. | |
| ५. | श्री.सुरेशकुमार जेथलिया,वि.स.स. | |
| ६. | श्री. कैलास गोरंट्याल, वि.स.स. | |
| ७. | श्री. विलास तरे, वि.स.स. | |
| ८. | श्री. किसन कथोरे, वि.स.स. | |
| ९. | श्री. दिलीप मोहिते, वि.स.स. | |
| १०. | श्री. कृषिभूषण साहेबराव पाटील, वि.स.स. | |
| ११. | श्रीमती संध्यादेवी देसाई उर्फ कुपेकर , वि.स.स. | |
| १२. | श्री. प्रकाश मेहता, वि.स.स. | |
| १३. | श्री. जयकुमार रावल, वि.स.स. | |
| १४. | श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स. | |
| १५. | श्री. राजन साळवी, वि.स.स. | |
| १६. | प्रा. शरद पाटील, वि.स.स. | |
| १७. | डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स. | |
| १८. | श्री. मंगेश सांगळे, वि.स.स. | |
| १९. | श्री. मुफ्ती मोहम्मद ईस्माईल अ. खलिक, वि.स.स. | |
| | निमंत्रित | |
| ● २०. | श्री. विजय घोडमारे, वि.स.स. | |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.श्रीनिवास जाधव,विशेष कार्य अधिकारी,
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
(४) श्री. जगदीश टोपरे, कक्ष अधिकारी.

- विधानसभा आश्वासन समितीवर मा.अध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ नोव्हेंबर,२०१३ रोजीपासून श्री. विजय घोडमारे, वि.स.स. यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.विधानसभा आश्वासन समितीचे सदस्य श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नवी, वि.स.स. यांची मंत्रीमंडळात नियुक्ती झाल्यामुळे रिक्त झालेल्या त्यांचे जागी श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स यांची समिती सदस्य म्हणून मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ३० जुलै, २०१४ रोजी नामनियुक्ती केली आहे.

(पाच)

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक<br>(१) | विषय<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>(३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना :** | .. .. |
| १. | विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या | .. .. |
| २. | विवरणपत्रे विधानसभेस सादर होण्यास झालेला विलंब | .. .. |
| ३. | सन १९९१ पासून ते जून २०१४ अखेरपर्यंत वर्षनिहाय व विभागनिहाय आश्वासनांची प्रलंबित यादी. | |
| ४ | अभिप्राय व शिफारशी | .. .. |
| | **परिशिष्टे :** | .. .. |
| | **परिशिष्ट-एक** - आश्वासनांवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | .. .. |
| | **परिशिष्ट-दोन** -आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके | .. .. |
| | **परिशिष्ट-तीन** - आश्वासनांवरील कार्यवाहीचे नमुना विवरण | .. .. |
| | **परिशिष्ट-चार**- समितीच्या बैठकींचे कार्यवृत्त | .. .. |

# प्रस्तावना

मी, विधानसभा आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन तिच्या वतीने समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे. सन २०१३ च्या पहिल्या अधिवेशनात विधानसभेत शासनातर्फे देण्यात आलेली काही प्रलंबित आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही यासंदर्भात विभागांकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा समितीचा हा अहवाल आहे.

सन २०१३ च्या पहिल्या अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून विधान सभागृहात देण्यात आलेल्या काही प्रलंबित आश्वासनांच्यासंदर्भात आश्वासन समितीचा सदरहू पहिला अहवाल तयार करण्यात आला आहे.

आश्वासनांबाबत विभागाने केलेली कार्यवाही परिशिष्ट "एक" मध्ये देण्यात आली असून आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/ परिपत्रके परिशिष्ट "दोन" मध्ये देण्यात आले आहेत. तसेच आश्वासनांबाबतची माहिती सादर करण्याबाबतचे नमुना विवरणपत्र परिशिष्ट "तीन" मध्ये देण्यात आली आहे व समितीच्या बैठकांची संक्षिप्त माहिती परिशिष्ट "चार" मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

समितीने सदरहू अहवालावर दिनांक , २०१५ रोजी झालेल्या बैठकीत विचार करुन तो संमत केला.

| | |
|---|---|
| **विधान भवन,**<br>मुंबई,<br>दिनांक : २०१५. | ,<br>समिती प्रमुख,<br>विधानसभा आश्वासन समिती |

# सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या
# अहवाल

सन २०१३ चे पहिले अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी **प्रलंबित ५५७** आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी खाली त्यासमोर दर्शविलेल्या दिनांकास विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**सन २०१३ च्या पहिल्या अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीबाबत पटलावर ठेवलेल्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व संख्या,**

| अ.क्र. | आश्वासन पटलावर ठेवल्याचा दिनांक | आश्वासन क्रमांक | आश्वासन संख्या |
|---|---|---|---|
| १) | दिनांक ३१ जुलै, २०१३ | २७,६५,६८,९५,१००,१०४,१३०,१३३,१४८,१६९,१८७,१९२,२१०,२११,२२१,२४२,२५३,३२३,३२७,३३२,३३६,३९०,३९१,४३२,४३३,४३४,४४४,४५४,४८२,५०६,५०८,५३८,५४३,५४४,५४६. | ३५ |
| २) | दिनांक १८ डिसेंबर, २०१३ | १,३,६,७,८,९,१२,२३,२६,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४२,४४,५१,५५,५६,५७,६३,६४,७३,७५,८५,८६,८७,८८,८९,९४,९७,१०२,१०३,१०८,११०,११८,१२५,१२७,१२८,१२९,१३१,१३२,१३६,१३७,१३८,१३९,१४४,१४५,१५५,१५६,१५७,१६१,१६८,१७४,१७९,१८०,१८१,१८२,१८३,१८५,१९०,१९१,२१७,२१८,२१९,२२३,२२४,२२५,२२६,२२७,२२८,२२९,२३०,२३१,२३२,२३३,२३४,२३७,२३८,२३९,२४०,२४१,२४४,२४७,२४८,२५०,२५१,२५२,२५६,२५७,२५८,२५९,२६०,२६१,२६२,२६३,२६४,२६६,२८२,२८४,२८७,२९२,२९५,३०१,३०४,३०७,३०९,३१४,३१५,३२५,३३३,३३४,३३५,३३७,३३८,३३९,३४०,३४१,३४२,३४३,३५६,३५७,३५८,३६४,३६९,३७०,३७१,३७२,३७३,३७४,३७५,३७७,३७८,३८८,३८९,३९२,३९४,३९६,३९८,४०३,४०४,४०५,४०८,४११,४१२,४१३,४१५,४२१,४२४,४२५,४२७,४२९,४४०,४४१,४४२,४४३,४४६,४५५,४५६,४५८,४५९,४६१,४६२,४६३,४६४,४६७,४६८,४६९,४७१,४७७,४७९,४८०,४८३,४८६,४९८,५००,५०१,५०२,५०३,५०५,५१३,५२५,५२८,५३१,५३६,५४५,५४७,५५२,५५४,५५५. **४० वगळले.** | १९७ |
| ३) | दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ | १०,१५,१६,१७,१९,२०,४३,४६,५४,६२,७४,७६,७७,७८,७९,८०,८१,८२,९३,९८,९९,१०१,१०७,११५,११९,१२०,१२१,१२२,१४७,१४९,१५०,१५१,१५२,१५३,१५४,१६०,१६४,१७०,१७२,१७६,१७७,१८८,२१२,२१५,२१६,२२२,२३६,२४९,२८०,२८३,२८९,२९०,२९१,२९३,२९४,२९७,३०२,३०६,३११,३१२,३३१,३५९,३६२,३६६,३८०,३८२,३८६,३८७,३९९,४०१,४२३,४३६,४४७,४४८,४४९,४५०,४५१,४५२,४५३,४६५,४७०,४८४,४८५,४८९,४९०,४९९,५०४,५०९,५१०,५११, ५१८,५२१,५२६,५२७,५४२. | ९७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **१८६,५१२ वगळले.** | |
| ४) | दिनांक १२ जून, २०१४ | २,४,५,२२,२८,४७,४८,४९,५०,५२,५८,५९,६१,६७,६९,८३,९१,९६,१०५, १०६,१११,११२,११३,१२३,१३४,१४०,१४१,१७३,१७५,१७८,१८४,१८९,१९५, १९६,१९७,२००,२०१,२०२,२०३,२०४,२०५,२०६,२०७,२०९,२१३,२१४, २४६,२५४,२६५,३००,३०८,३१०,३१३,३१६,३१७,३१८,३१९,३२०,३२१, ३४४,३४५,३४६,३४७,३४८,३४९,३५०,३५१,३५२,३५३,३५५,३६७, ३६८, ३९३,४०२,४१८,४१९,४२०,४३०,४३१,४३५,४४५,४७८,४८७, ४९३,४९५,५१४,५१५,५१६,५१७,५१९,५२२,५२३,५२४,५३२,५३३,५३७, ५३९,५४०,५४१,५५३,५५६,५५७. | १०२ |
| | | **एकूण** | **४३१** |

## विवरणपत्रे सादर होण्यास झालेला विलंब.

सन २०१३ च्या पहिल्या अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून देण्यात आलेल्या एकूण ५५७ आश्वासनांपैकी मा.संसदीय कार्य मंत्री यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्राची दिनांक निहाय संख्या विचारात घेता असे दिसून येते की, साधारणत: १९७ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ४ महिना १७ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, ९७ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ६ महिने २७ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, १०२ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष एवढा कालावधी लागलेला आहे.अद्याप १२६ आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे प्रलंबित आहेत. या प्रलंबित आश्वासनांची सविस्तर माहिती देणारे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

### प्रलंबित आश्वासनांची विभागनिहाय यादी

| अ.क्र. (१) | विभागाचे नांव (२) | आश्वासन क्रमांक (३). | आश्वासनांची एकूण संख्या. (४) |
|---|---|---|---|
| १. | गृहनिर्माण विभाग. | १३,१४,२३५,४१४,४१६. | ०५ |
| २. | महसूल व वन विभाग | ६६,७०,८४,९०,९२,१२४,१२६,१५९,३२२,४००,४९१,४९२,४९४,४९६,४९७,५३४,५३५ | १७ |
| ३. | उद्योग ऊर्जा व कामगार विभाग. | २४,११४,११६,११७,१५८,३२४,३२६,३२८,३२९,३३०,४०९ | ११ |
| ४. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | १४६,१९३,१९४,२४३,५०७. | ०५ |
| ५. | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग. | १६२,१६३ | ०२ |
| ६. | नगरविकास विभाग | ७२,१०९,१३५,१४२,१४३,१९८,१९९,२६७,२६८,२६९,२७०,२७१,२७२,२७३,२७४,२७५,२७६,२७७,२७८,२७९,२८१,२९६,२९८,२९९,३०३,३६०,३६१,३६३,४१७,४२६,४६६,४७२,४७३,४७४,४७५,४७६,५२०,५४९,५५०,५५१. | ४० |
| ७. | गृह विभाग | ६०,२४५,३७६,३८१,४२८,४३७,४३८,४३९,५२९,५३० | १० |
| ८. | सार्वजनिक बांधकाम विभाग | ५३,३५४,३८३,३८४,३८५. | ०५ |
| ९. | जलसंपदा विभाग | ७१,३९५,३९७,४८१,५४८ | ०५ |
| १०. | अन्न व नागरी पुरवठा विभाग | ३६५ | ०१ |
| ११ | कृषी व पदुम विभाग | ४१. | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | ग्रामविकास व जलसंधारण विभाग | १६५,१६६,४२२,४५७. | ०४ |
| १३. | वित्त विभाग | १६७,२२० | ०२ |
| १४. | आदिवासी विकास विभाग | २५५,३७९. | ०२ |
| १५. | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग | ४६० | ०१ |
| १६. | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ११,२०८,२८५,२८६,४०६,४०७,४१०. | ०७ |
| १७. | सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग | १८,२१,१७१. | ०३ |
| १८. | नियोजन विभाग | २५,४५,२८८,४८८ | ०४ |
| १९. | पर्यावरण विभाग | ३०५. | ०१ |
| | | एकूण | १२६ |

- पुढील क्रमांक कोणत्याही आश्वासंनाना देण्यात आले नाहीत.
- पुढील क्रमांकाचे आश्वासन समितीने वगळले आहे.

उपरोक्त आश्वासनांबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही/अंतरिम माहिती देखील, संबधित विभागांनी समितीला पुरविलेली नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करीत आहे. याबाबत विभागाने वेळीच कार्यवाही केली असती तर ही आश्वासने प्रलंबित राहिली नसती असे समितीला वाटते. आता तरी विभागाने या प्रकरणी गंभीर दखल घेऊन प्रलंबित असलेल्या आश्वासनांबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर लवकरात लवकर ठेवण्याची व्यवस्था करावी. या आश्वासनांबाबत शासनातर्फे करण्यात आलेल्या **" कार्यवाहीचे विवरण"** जरी सादर करण्यात आलेले नसले तरी या आश्वासनांच्या क्रमांकानुसार करण्यात आलेल्या नोंदी सभागृहाच्या माहितीसाठी अहवालामध्ये अंर्तभूत करण्याचे समितीने ठरविले आहे. **"कार्यवाहीचे विवरणपत्र तात्काळ सादर करण्यात यावे"** असे त्या ठिकाणी नमूद करण्यात आले आहे. एक महिन्याच्या आत असे विवरणपत्र सादर करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

# अभिप्राय - शिफारशी

विधानसभा सभागृहात विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेला उत्तर देताना मा.मंत्री महोदयांकडून आश्वासने, अभिवचने दिली जातात. सभागृहात दिलेल्या सदर आश्वासनांची पूर्तता शासनाने ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. तथापि, बहुतेक प्रकरणात आश्वासनाच्या पूर्ततेसाठी सदर विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागत असल्याची बाब समितीने आपल्या अहवालांद्वारे यापूर्वी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली असूनही त्यामध्ये फारशी सुधारणा झाल्याचे समितीला आढळून येत नाही.

**अत: समिती शिफारस करते की, शासनाद्वारे देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता कटाक्षाने ९० दिवसांत करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीस कळविण्यात यावा.**

आश्वासनांवर केलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर विलंबाने ठेवणे ही समितीसमोरील एक मोठी समस्या आहे. सदर विवरणपत्रे विलंबाने पटलावर ठेवल्यामुळे संबंधित आश्वासने विषय कालबाहय झाल्याने विचारात घेणे समितीला शक्य होत नाही, परिणामी समितीच्या कामकाजात विस्कळीतता येते.

**अत: समिती अशी शिफारस करते की, सभागृहात आश्वासन देण्यात आल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत त्यानंतर येणाऱ्या लगतच्या अधिवेशनामध्ये सर्वच्या सर्व आश्वासने पटलावर ठेवण्यात यावीत. आश्वासनांची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर विहित कालावधीपेक्षा विलंबाने ठेवणाऱ्या संबंधित मंत्रालयीन विभागाच्या उप सचिव अथवा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यावर विलंबाची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

आधुनिक काळात दळणवळणाची आणि संपर्काची विविध साधने सर्व स्तरांवर उपलब्ध असून अशा साधनांचा वापरही मोठ्या प्रमाणावर होत आहे. ही बाब विचारात घेता समिती शिफारस करते की, शासनामार्फत वेळोवेळी पटलावर ठेवण्यात येणाऱ्या वर्षनिहाय व अधिवेशननिहाय **आश्वासनांबाबतच्या कार्यवाही पूर्ततेची विवरणपत्रासह माहिती CD (Compact Disc) स्वरूपात यापुढे प्रत्येक वेळी समितीला पुरविण्यात यावी.**

**समिती अशीही शिफारस करते की, सदर अहवालात समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने , सदर अहवाल संबंधित मंत्रालयीन विभागाला प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत उक्त आश्वासनावर कार्यवाही करून व त्याची पूर्तता करून त्याबाबतची माहिती समितीला तात्काळ पाठविण्यात यावी.**

आश्वासनाच्या पूर्तीबाबत मंत्रालयीन विभागांकडून समितीपुढे ठेवण्यासाठी पाठविण्यात येणा-या विवरणपत्रात आश्वासनाचा विषय मंत्री/ राज्यमंत्री महोदयांकडून सभागृहात देण्यात आलेले आश्वासन व करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा विभागाने केलेला उल्लेख यामध्ये ब-याच प्रकरणी विसंगती असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. अशाप्रकारे समितीला गृहित धरुन समितीची दिशाभूल करण्याची विभागांची प्रवृत्ती उचित नाही. या बाबीची समितीने गांभिर्याने दखल घेतली असून यापुढे असे प्रकार आढळून येणार नाहीत, अशी समितीची धारणा आहे.